संदर्भ : लोकमत आवृत्ती : पुणे दि. ३० डिसेंबर २०१८ पान नं. ९

लोकमत

# एक लाख कर्मचाऱ्यांना अखेर मिळाला न्याय

## सहाव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन

विशेष प्रतिनिधी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात १ जानेवारी २००६ ते २६ फेब्रुवारी २००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवानिवृत्तीवेतन देण्याचा आदेश वित्त विभागाने काढला आहे. दीर्घ न्यायालयीन आणि पाठपुराव्याला यश आले आहे.

वरील तीन वर्षांच्या कालावधीत जे कर्मचारी, अधिकारी सेवानिवृत्त झाले त्यांना सहाव्या वेतन आयोगाचा लाभ देण्यात आलेला नव्हता. तो मिळावा यासाठी कर्मचाऱ्यांच्या वतीने न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सावित्रीबाई नरसय्या गुडप्पा विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिला होता. राज्य मंत्रिमंडळाने अलिकडे झालेल्या बैठकीत त्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला होता. त्याची अंमलबजावणी केल्याने राज्याच्या तिजोरीवर सुमारे दोन हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. त्या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित सेवानिवृत्ती वेतन तर मिळेलच शिवाय एकरकमी थकबाकीदेखील दिली जाणार आहे. थकबाकीवर व्याज मात्र दिले जाणार नाही.

### फेरफारासह निर्णय लागू

सरकारी कर्मचाऱ्यांना हा निर्णय लागू होईल. मात्र, मान्यताप्राप्त अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठांमधील निवृत्तीवेतनधारक/ कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना हा निर्णय योग्य त्या फेरफारासह लागू होणार आहे.

Pune Main
Page No. 9 Dec 30, 2018
Powered by: erelego.com

महाराष्ट्र लोकसेवा आयोग : ग्रंथालय दैनिक वर्तमानपत्र कात्रण